मा. शिक्षणप्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे ५.
यांजकडून

मा./श्री. व्यवस्थापक,
सिंधु विद्याभवन इंग्लीश प्रायमरी स्कूल,
साधु वासवानी नगर, औंध, पुणे-७
यांजकडे

विषय : **शाळेस मान्यता**

संदर्भ :

मा. शिक्षण मंडळाने ठराव क्रमांक २४४ दिनांक २४-२-७८ ने खालील शर्तींवर " सिंधु विद्याभवन इंग्लीश प्रायमरी स्कूल" औंध, पुणे-७ या इंग्लीश माध्यमाचे शाळेस मान्यता देण्यात येत आहे. सन १९७७-७८ इयत्ता १ ली व २ री आणि सन १९७८-७९ साठी इयत्ता १ ली ते ३ री पर्यन्तच मान्यता प्रोव्हिजनली देण्यात येत आहे. नवीन वर्ग आणि तुकडयांसाठी तसेच १९७८-७९ नंतर मान्यता चालू ठेवण्यासाठी रितसर अर्ज करून खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक राहील.

(१) तुमच्या संस्थेची आर्थिक स्थिती शाळा सातत्याने चालविण्याइतपत चांगली राखली पाहिजे.

(२) शाळा चालू ठेवणेसाठी शासनाकडून अनुदान मिळणार नाही. हयापुढे केव्हांही अनुदानमिळण्यासाठी तुमच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

(३) शाळेत प्रशिक्षित शिक्षकांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

(४) मान्य खाजगी प्राथमिक शाळांना बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन रूल्स १९४९ मधील लागू असलेले नियम तुमचे शाळेस बंधनकारक राहतील.

(५) वेळोवेळी निघणारे शासकीय आदेश पाळणे तुमचेवर बंधनकारक राहील.

(६) शाळेतील सेवकांच्या नेमणूका, वेतन, रजा, नेमणूकींची व निवृत्तीची वयोमर्यादा इत्यादि बाबींची शासकीय नियमाप्रमाणे पूर्तता करणे आवश्यक आहे.

(७) मात्र मुख्याध्यापकाची नेमणूक करणे आवश्यक राहील.

कळावे, दिनांक - ११/४/७८.

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे मनपा.

Inward No. 2133 11.13-4-78

Financial Position

No grants

Qualified Teachers

Bombay Primary Edu. 1949 Rules applicable

Govt. Rules applicable

Salaries & Leave staff

Head Master necessary

SIND CO-OP. HOUSING SOCIETY LTD
13 APR 1978
INWARD No. 2133
POONA-7

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग प्राथमिक**
**ई-मेल eduprip2info@gmail.com**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा 4/1283/138 /2025 दिनांक:- 07/01/2026

प्रति,

मा. शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे

विषय:- शाळेच्या नावात बदल करणे बाबत.

संदर्भ:- 1.शासन पत्र क्रमांक -1096/7088/माशि-1, मंत्रालय, मुंबई-32, दिनांक 03/12/1998
2.मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे यांचेकडीलआदेश जा.क्र.प्रा/प्राशि/खाप्राशा/ मान्यता /पुवि/13,दिनांक 29 मार्च 2000
3.मुख्याध्यापक, अर्जन वाटुमल, सिंधू विदया भवन औंध पुणे यांचेकडील प्रस्ताव

उपरोक्त संदर्भ क्र 1 व 2 अन्वये सिंधू चॅरीटेबल ट्रस्ट संचलित सिंधू विदया भवन औंध पुणे,याशाळेस शासन मान्यता मिळालेली आहे. संदर्भ क्र.3 अन्वये संस्थेने खालील प्रमाणे शाळेच्या नावात बदल करणे बाबत याकार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे.

| अ क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार | मान्यता/ इयत्ता | मान्यता वर्ष | बदल करावयाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पुणे | सिंधु चॅरीटेबल ट्रस्ट औंध पुणे 07 | सिंधु चॅरीटेबल ट्रस्ट संचलित सिंधु विदया भवन औंध पुणे 07 | इंग्रजी | स्वयंअर्थ सहाय्यिता | प्राथमिक/ माध्यमिक | शिक्षण मंडळ ठराव क्रमांक 344 दिनांक 24/03/1978 | सिंधु चॅरीटेबल ट्रस्ट संचलित अर्जन वाटुमल सिंधु विद्या भवन, औंध पुणे 07 |

सदरचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव सादर करण्यात येत आहे.
सोबत:- मुळ प्रस्ताव

(संजय नाईकडे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीस्तव

1. मुख्याध्यापक, सिंधु चॅरीटेबल ट्रस्ट संचलित सिंधु विदया भवन औंध पुणे 07

महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर, पुणे-४११ ००१

Phone : (020) 26122217
Wsite : www.dydepune.co.in
e-mail :
dydpune.egov@gmail.com

| **शालेय शिक्षण विभाग** | जा.क्रं.शिउसं/प्राथ-२०२/सुकुमा/शाळा नावात बदल/पुणे/२०२६/<br>दिनांक :- |
|---|---|

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

**विषयः**- शाळेच्या नावात बदल करणेबाबत
सिंधू चॅरिटेबल ट्रस्ट औंध, पुणे-०७ संचलित सिंधु विदया भवन औंध, पुणे-०७
**ऐवजी**
सिंधू चॅरिटेबल ट्रस्ट औंध, पुणे-०७ संचलित अर्जन वाटुमल सिंधु विदया भवन औंध, पुणे-०७

**संदर्भः**- १. मा. अवर सचिव शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक
एसएसडन/१०९६/७४६०/माशि-१ दि. ०३/१२/१९९८.
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे यांचेकडील प्रस्ताव
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा४/१२८३/१३८/२०२५ दि. ०७.०१.२०२६.

उपरोक्त विषयांस अनुसरुन सादर करण्यात येते की, सिंधू चॅरिटेबल ट्रस्ट औंध, पुणे-०७ यांचेकडील ठराव दि. ११.१२.२०२५ अनुसार सिंधू चॅरिटेबल ट्रस्ट औंध, पुणे-०७ संचलित सिंधु विदया भवन औंध, पुणे-०७ ऐवजी सिंधू चॅरिटेबल ट्रस्ट औंध, पुणे-०७ संचलित अर्जन वाटुमल सिंधु विदया भवन औंध, पुणे-०७ असा बदल करण्याचे ठरविले आहे.

| जुने नाव | नवीन नाव |
|---|---|
| सिंधू चॅरिटेबल ट्रस्ट औंध, पुणे-०७ संचलित सिंधु विदया भवन औंध, पुणे-०७ | सिंधू चॅरिटेबल ट्रस्ट औंध, पुणे-०७ संचलित अर्जन वाटुमल सिंधु विदया भवन औंध, पुणे-०७. |

संदर्भ क्र. १ चे शालेय शिक्षण विभाग मुंबई यांच्या दि. ०३.१२.१९९८ चे परिपत्रकानुसार विभागीय शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांच्या कार्यालयाच्या दप्तरी नोंद घेण्यात आलेली आहे. सदर नोंद आपल्या कार्यालयाच्या दप्तरी घेण्यात यावी.

Digitally signed by
Ganpat Shankarrao More
Date: 19-02-2026
22:14:27

(डॉ. गणपत मोरे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

**प्रत माहितीस्तवः**-
अध्यक्ष/ सचिव, सिंधू चॅरिटेबल ट्रस्ट औंध, पुणे-०७.